**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –2, March – 2011**
**ISSN:-** 2230-7850
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# वर्धा जिल्हयातील आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक व व्यवसायिक माहितीचे अध्ययन

प्रा. मिलींद ए. सवाई
डॉ. आबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.

**सारांश**

एखाद्या सामाजातील काही सामाजिक घटनांच्या संदर्भात काही बाबी संशोधन वृत्तींच्या व्यक्तीला समस्यावत वाटणे हिच खऱ्या अर्थाने संशोधनाची सुरूवात आहे.

संशोधनासाठी निवडलेले विषयक्षेत्र किंवा संशोधनाचा विषय या वरून त्या विषयाच्या काही पैलुंसंबंधी आपण अनभिज्ञ असल्याची जाणीव होते आणि ते पैलु जाणुन घेण्याची त्यांच्या मनात जिज्ञासा निर्माण होऊन संशोधकाचे संशोधन विषयाच्या समस्यांची कारण मिमांसा करण्याचे लक्ष वेधले जाते.

प्रस्तुत संशोधनात आदिवासी यांच्या वैयक्तिक माहिती द्वारे वर्धा जिल्हयातील आदिवासी स्त्रियांच्या व्यवसायिक माहितीचे अध्ययन करण्यात आले आहे. तसेच जिल्हयातील १०० आदिवासी स्त्रियां अध्ययना करीता निवडल्या आहे.

**प्रस्तावना**

भारतीय समाजात एकुण लोकसंख्येपैकी ८ टक्के लोकसंख्या असलेली आदिवासी समुदाय दुर्गम अतिदुर्गम, भुप्रदेशात वास्तव्याला असल्यामुळे सामाजिक, आर्थीक, व्यवसायीक, शैक्षणिक दृष्टया मागासलेला आहे. पण स्वतंत्र प्राप्ती नंतर विकासाच्या क्रिया वाढत गेल्या त्यामुळे अनुसुचित जमातिच्या कल्याणासाठी ज्या काही तरतूदी करण्यात आल्या त्या तरतुदीचा त्यांना फायदा झाला की नाही. त्यांच्या व्यवसायिक समस्या, गृहव्यवस्थापनाच्या समस्या काय आहे व इतर समस्या कोणत्या त्यावरील ज्या काही उपाययोजना आखण्यात आल्या आहे याची पूर्ण माहिती त्यांना देण्याचे कार्य या अभ्यासाद्वारे देण्यात येईल.

प्रस्तूत अध्ययनात कुटूंबात व्यवस्थापन प्रक्रियेचा उपयोग केला जातो का? कौटूंबीक व्यवस्थापनामध्ये औद्योगिक क्षेत्रात व्यवस्थापन प्रक्रियेचे महत्व लक्षात आणून देणे तसेच आहार शास्त्राद्वारे आहाराचे महत्व, अन्नघटक कशामुळे होते व वैद्यकीय सेवेचाच आधार घ्यवा पण काही प्रमाणात आहाराकडे पण लक्ष देण्यात यावे. त्याकरीता काय करावे ही उपाय योजना सांगणे. आरोग्याच्या दृष्टीने घराची स्वच्छता, रोग होऊ नये म्हणून किती प्रतिसंबध करावे. बालसंगोपण, परिवार नियोजन गृहनिर्माण याद्वारे चुल किंवा धूरमुक्त चूल यासारख्या उपयोगात येणाऱ्या साधनांची माहिती पुरविणे रूढी परंपरेने चाल आलेल्या गैरसमजुती. अंधश्रद्धा याबाबत शिक्षणाद्वारे माहिती पुरविणे.

खाण्यापिण्याच्या सवयी राहणीमान स्वच्छता सांडपाण्याची व्यवस्था, पाण्याची स्वच्छता, विद्युत समस्या तसेच शिक्षणामुळे होणारे फायदे व शिक्षणाप्रती जिज्ञासा निर्माण करणे शिक्षणाचे महत्व पटवून देणे त्यामुळे कोणते फायदे होतात हे पटवून देणे.

व्यवसायाबाबत येणाऱ्या अडचणी, शिकार करतांना येणाऱ्या अडचणी, मोलमजुरी करून कमी प्रमाणात मिळणारा मोबदला व इतर व्यवसाय करून त्याचा कसा फायदा घेता येईल याचे महत्व पटवून देणे हया व इतर सर्व व्यवस्था पाहून त्यावर उपाययोजना सुचविणे इत्यादी अनेक समस्यांनी संशोधकाचे लक्ष या अध्यापन विषयाकडे आकर्षिल्या गेल्यामुळे या संशोधन कार्याला दिशा मिळाली.

**दर्जा व भूमिका**

आदिवासी समाजाच्या सामाजिक संघटनेचा विचार करीत असताना स्त्रियांचा दर्जा व भूमिकेचा अभ्यास लक्षणीय ठरतो. आदिवासी समाजात स्त्रियांना प्रदान केलेले अधिकार आणि त्यांचे कर्तव्य यावरून स्थान व भूमिका निश्चित करता येतात. आदिवासी समाजातील स्त्रियांच्या स्थानासंबंधी अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. आदिवासींमध्ये दिसणारी वधुमूल्याची प्रथा, विवाहपूर्व व विवाहबाहय लैंगिक संबंधास असणारी अनुमती, स्त्रियांवरील धार्मिक निर्बंध यावरून आदिवासी समाजात कनिष्ठ दर्जा दिला जातो. स्त्रियांना या जमातीत गुलामासारखे वागविले जाते. त्यांना योग्य प्रकारची वागणूक दिली जात नाही. हा एक मतप्रवाह, तर याउलट दुसरा मतप्रवाह असा की, आदिवासी जमातीत स्त्रीला कुलस्वामिनी समजून तिला पुरूषाच्या बरोबरीने सन्मानाची वागणूक दिली जाते. आदिवासी समाजात स्त्रीचे स्थान व दर्जा उच्च प्रतीचा असतो असे म्हटले जाते. परंतु हे दोन्ही मतप्रवाह एकांगी स्वरूपाचे किंवा परस्परविरोधी स्वरूपाचे आहेत.

**आदिवासींची अर्थव्यवस्था :-**

कोणत्याही समाजातील व्यक्तीचा आर्थिक स्थितीचा प्रभाव त्या व्यक्तीच्या कार्यावर पडत असतो. मार्क्सवादी विचारवंतांच्या मते, ‘‘अर्थव्यवस्था ही समाजजीवनाची आधारभूत सामाजिक संस्था आहे. संपूर्ण समाजरचना हा त्याचा आधार असून त्या आधारानेच अन्य सामाजिक संस्थांची रचना ठरत असते. म्हणून मानवी समाजाच्या धार्मिक, राजकीय, सामाजिक अशा कोणत्याही अंगाचा अभ्यास करावयाचा असला तर अशा अभ्यासासाठी समाजाच्या आर्थिक अंगाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. आधुनिक काळातील समाजाचे स्वरूप प्राचीन काळातील समाजाच्या तुलनेत अधिक गुंतागुंतीचे व जटिल आहे. हीच स्थिती आजच्या काळातील अर्थव्यवस्थेचीही आहे.

मानवशास्त्राच्या पद्धती व शास्त्रीय गरजेनुसार आजच्या काळातील गुंतागुंतीच्या अर्थव्यवस्थेचे आकलन करून घेण्यासाठी आदिवासी समाजातील सरळ व साधे स्वरूप असणाऱ्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास उपयुक्त ठरतो. मानवतेच्या सुरूवातीपासूनच आपले अस्तित्व टिकविण्यासाठी अवितरतपणे धडपड आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी चाललेली असते. अर्थातच अन्न,वस्त्र, निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आपोआप पूर्ण होत नाहीत. त्यासाठी माणसाला अक्षरशः झगडावे लागते. या गरजांची पूर्ती करताना सभोवतालच्या वातावरणातील उपलब्ध साधनसामुग्रींचा कौशल्याने उपयोग करावा लागतो. या गरजा भागविण्यासाठी इतरांचे सहकार्य घ्यावे लागते. ‘जीवन पोषणाच्या गरजा भागविण्यासाठी मानवी समाजात केल्या जाणाऱ्या प्रयत्नांचा समावेश आर्थिक क्रियांमध्ये होते.’

**आदिवासी स्त्रीयांचा वयोगट दर्शक तक्ता**

| वय | २१ ते ३० | ३१ ते ४० | ४१ ते ५० | ५१ चे वर | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | १८ | २६ | ४२ | १४ | १०० |
| प्र.श.प्रमाण | (१८%) | (२६%) | (४२%) | (१४%) | (१००%) |

वरील तक्या असे स्पष्ट होते की, वयोगटाकरीता उत्तरदात्याच्या २० पासुन ते ५० चे वर पर्यंत सर्वच गटातील स्त्रियांचा विचार करण्यात आला त्याकरीता २० ते ३० चा वयोगटातील स्त्रिया १८% होत्या तर ३० ते ४० वयोगटात असणाऱ्या स्त्रिया २६% तर ४० ते ५० वयोगटातील ४२% होत्या आणि ५० ते वर वयोगट असणाऱ्या स्त्रिया १४% एवढया आढळल्या.

**आदिवासीच्या मुख्य व्यवसाय दर्शक तक्ता ::-**

| व्यवसाय | मजुरी | शेती | स्वंयंव्यवसाय | शासकीय रोजगार | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| **संख्या** | ५४ | ३२ | १२ | ०२ | १०० |
| **प्रतिशत प्रमाण** | (५४%) | (३२%) | (१२%) | (२%) | (१००%) |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, जवळपास अर्धे अधिक वर्धा जिल्हयातील आदिवासी इतर व्यवसायात आणि शेतीमध्ये मजुरी करून उदरनिर्वाह करतात. ५४% आदिवासी मजुरी करतात, ३२% आदिवासी शेती करतात, १२% आदिवासी स्वंयंव्यवसाय करतात, व २% आदिवासी शासकीय रोजगार करतात.

**आदिवासीच्या पारंपारिक व्यवसाय दर्शक तक्ता :**

| पारंपारिक व्यवसाय | डिंक | मोहफुले | तेंढुपत्ता | मद्यगोळा करणे | रान मोळी गोळा करणे | शिकार करणे | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | २ | २ | १८ | २ | ८ | ४ | ० |
| प्रतिशत प्रमाण | (२%) | (२%) | (१८%) | (२%) | (८%) | (४%) | (०%) |
| डिंक / तेंढुपत्ता | तेंढूपत्ता / मोह | तेंढूपत्ता / मध | तेढूपत्ता / मोळी विकणे | मोळी विकणे / शिकार करणे | डिंक / मोह | एकुण | |
| ८ | २४ | ६ | १४ | ४ | ८ | १०० | |
| (८%) | (२४%) | (६%) | (१४%) | (४%) | (८%) | १००% | |

व्यवसाय करीता आदिवासींची आर्थिक दैनावस्था असते केवळ मजुरी करून उदरनिर्वाह होत नाही म्हणून इतर व्यवसाय करतात ज्यात त्यांचे परंपरागत व्यवसाय येतात. त्याकरीता निसर्ग निर्मित साधन संपत्तीत पुढील साधनांचा वापर करणारे जसे डिकांचा वापर करणारे २%, मोहाचा वापर करणारे २%, मधाचा वापर करणारे २%, तेंढूपत्याचा वापर करणारे १८%, मोळी विकणे व व्यवसाय करणारे, ८%, तर शिकार करणे हा व्यवसाय करणारे ४%, तर इतर ज्यात टोपल्या विकणे, खाटा विणणे इ. व्यवसाय करणारे ० तर संयुक्त रित्या व्यवसाय करणारे जसे डिंक / तेंढुपत्ता वापरणारे ८% तेंढूपत्ता / मोह वापरणारे २४% तेंढूपत्ता / मध वापरणारे ६%, तेढूपत्ता २ मोळी विकणे हा व्यवसाय करणारे १४% तर मोळी विकणे / शिकार करणे हा व्यवसाय करणारे ४% तर डिंक / मोह वापरणारे ८% इतके आहे.

**आदिवासी शेती सोबत जोडधंदा दर्शक तक्ता :**

| जोडधंदा | पशुपालन | कुक्कुटपालन | मत्सपालन | एकुण |
|---|---|---|---|---|
| **संख्या** | ७६ | २४ | ० | १०० |
| **प्रतिशत प्रमाण** | ७६% | २४% | ०% | १००% |

शेतीमधुन पूरेशी मजूरी प्राप्त होत नसल्यामुळे काही आदिवासी जोडधंदा करतात. जोडधंद्यामध्ये प्रामुख्याने पशुपालन करणारे आदिवासी ७६% तर कुक्कुटपालन करणारे २४% तर मत्सपालन करणारे ० इतके आढळले.

**आदीवासी लोकांना सरकार कडून अपेक्षा दर्शक तक्ता :-**

आदीवासी लोकांसाठी सरकारने काय करावे? असे स्वत: आदीवासी यांना वाटते. यांचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने माहिती संकलित केली असता खालील आकडेवारी प्राप्त झाली.

| विवरण | रोजगार निर्मिती | मजुरीदर वृध्दी | विमा (रोजगार) योजना | भविष्य निर्वाह निधी | स्वस्त धान्य, कपडे व निवास | वृध्दांना आर्थिक मदत | मोफत व सक्तीचे शिक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ११८ | १२४ | ३० | ५५ | ११५ | १०५ | ५२ |
| प्र.श. प्रमाण | १९% | २०% | ५% | ९% | २२% | १७% | ८% |

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, १९% लोकांना सरकारने रोजगार निर्मिती करावी असे वाटते. २०% लोकांना मजुरीदरात वाढ करावी असे वाटते. ५% लोकांना रोजगार विमा योजना लागू करावी असे वाटते . यात निश्चित दिवस निश्चित मजुरी दराने कामे न मिळाल्यास विमा कंपनीव्दारा भरपाईची योजना असावी असे त्यांना वाटते. ९% लोकांना वृध्दापकाळासाठी भविष्य निर्वाह निधी योजना असावी असे वाटते. २२% लोकांना गरीब लोकांसाठी स्वस्त दरात धान्य, कपडे व निवास मिळावे असे वाटते. १७% लोकांना वृध्दांना आर्थिक मदत योजना असावी अशी अपेक्षा आहे. तर ८% लोकांना सरकारने मोफत व सक्तीचे शिक्षण द्यावे असे वाटत.

**निष्कर्ष**

- ४१ ते ५० वरील वयोगटातील ४२% उत्तरदाते सर्वात अधीक आढळून आले.
- वर्धा जिल्हयातील आदिवासी इतर व्यवसायात आणि शेतीमध्ये मजुरी करून उदरनिर्वाह करणारे ५४% उत्तरदाते सर्वात अधीक आढळून आले.
- जोडधंद्यामध्ये प्रामुख्याने पशुपालन करणारे आदिवासी ९६% उत्तरदाते सर्वात अधीक आढळून आले.
- बहुसंख्य लोकांना सरकारने रोजगार निर्मिती करावी, मजुरी दर वाढवावे आणि स्वस्त अन्न, वस्त्र, निवारा उपलब्ध करून द्यावा अशी आदीवासीं यांची सरकारकडून अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची**

- मेश्राम प्रा. सुरेश २०००, प्रात्याशिक सामाजिक संशोधन, कृष्णचंद्र एजन्सीज, लक्ष्मीनगर, नागपूर.

- उंबरकर डॉ. दिनकर २००७, जुलै, कोरकु आदिवासी, अवैत प्रकाशत गजानन पेठ, अकोला
- मांडवकर भाऊ १९६६, कोलाम,सेवा प्रकाशन रूख्मिणीनगर, विस्तार अमरावती
- शिरोळे डॉ. धेर्यशिल २००२, आदिवासी कथा व व्यथा
- खडसे डॉ. भा.की. १९९९, सामाजिक मानवशास्त्र, मंगेश प्रकाशन, रामदास पेठ, नागपूर
- पाटे सुमन १९९९, सामाजिक मानवशास्त्र विश्व पब्लिशर्स ॲंड डिस्ट्रीब्युटर्स
- प्रा. विद्यार्जन, समाजिक संशोधन पद्धती श्री. गजानन प्रकाशन, महल, नागपूर – ३२
- कऱ्हाडे डॉ. बी.एम. २००७, शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲंड कं. पब्लिशर्स
- घाटोळे प्रा.रा.ना. १९९०, समाजशास्त्र संशोधन तत्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर – १०
- गेरे डॉ. गोविंद, माहराष्ट्रातील आदिवासी जमाती